Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18848762

# प्रशासकीय सुधारणा आणि सुशासन

डॉ. स्वाती शेषेराव नरवडे[1]

## प्रस्तावना

काळानुसार समाज व्यवस्था आणि अर्थव्यवस्था बदलत असतात .विकास अथवा बदल हा निसर्गाचा नियम आहे .प्रत्येक देशाची एक स्वतंत्र शासन व्यवस्था व प्रशासन व्यवस्था असते. जगातील देशांचे वर्गीकरण प्रामुख्याने तीन गटात केले जाते या गटांमध्ये विकसित देश विकसनशील देश आणि अविकसित किंवा मागासलेले देश यांचा समावेश होतो. स्थानिक राजकीय सामाजिक भौतिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासन व प्रशासन व्यवस्थेचा विचार केला जातो. भारतीय प्रशासन व्यवस्था एक निरंतर बदलत गेलेली आहे. भारतीय प्रशासन व्यवस्था ही जगातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण प्रशासन व्यवस्था आहे .भारतीय प्रशासनाला फार मोठा वारसा मिळाला आहे .भारतीय प्रशासन व्यवस्था ही एक विकसित होत गेलेली प्रशासन व्यवस्था आहे.

आज शासनाव्यतिरिक्त अनेक बिगर शासकीय घटक स्वयंसेवी संस्था या लोकप्रशासनासाठी सहाय्यकारी भूमिका बजावताना दिसतात. लोकप्रशासनातील शासकीय संस्था आणि बिगर शासकीय संस्था यांच्या अशा सहकार्यात्मक प्रयत्नांचे वर्णन म्हणजे ' प्रशासन' होय. हा लोकप्रशासनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे म्हणजे प्रशासन ही शासनापेक्षा व्यापक संकल्पना आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने समाजवादी आणि कल्याणकारी विकासाचा आराखडा विकासाचे धोरण स्वीकारले. विकासभिमुख प्रशासनाचा भर जरी लोकसहभागावर असला तरी नियमितपणे प्रयत्न करून आणि कार्यक्रम घेऊन सुद्धा प्रशासकीय प्रक्रियेमध्ये जनतेचा खराखुरा सहभाग मिळवता आला नाही .भारत सरकारच्या सार्वजनिक कार्मिक जनशिकायत (लोक तक्रार) आणि पेन्शन मंत्रालयांतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि जनशिकायत (लोक तक्रार) विभाग भारतीय प्रशासकीय सुधारणाकडे लक्ष देते.

या संशोधनात भारतातील प्रशासकीय सुधारणा आणि चांगले शासन यांचे अध्ययन करून विश्लेषण केले आहे. प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व, प्रतिसाद, समता आणि समावेशकता, सहमती परिणाम आणि कार्यक्षमता नागरिकांचा सहभाग यांचा अभ्यास केला आहे. Digital India व e-services यांचा प्रशासकीय सुधारणावर काय प्रभाव

[1]सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छ. संभाजीनगर

पडतो हे पाहिले आहे. चांगले शासन म्हणजे प्रशासनात समानता पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिक केंद्रित प्रशासन यांचा अभ्यास केला आहे. भारतात प्रशासनिक सुधारणा आणि e-goverence यांचा उद्देश प्रशासन अधिक प्रभावी आणि उत्तरदायी करणे हा आहे.

प्रशासनातील विविध झालेल्या बदलांमुळे प्रशासनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसतो. असे लक्षात येते की, प्रशासनातील पारंपारिक दृष्टिकोन नागरिकांच्या गरजा भागविण्यास पुरेसे ठरत नाही, त्यामुळे प्रशासनाकडे प्रशासक म्हणून बघण्याचा दृष्टिकोनात बदल झाले आहे .प्रशासनामध्ये सुधारणा घडवून त्या जागी प्रतिसाद देणारे ,जबाबदार, सहभागास वाव देणारे आणि समतेवर आधारित असे प्रशासन निर्माण करणे असा याचा हेतू होता. हा नवा दृष्टिकोन म्हणून सुशासन ओळखला जातो. हा दृष्टिकोन प्रशासन ही नियमांनी बांधलेले न राहता ते नागरिकेंद्री होण्याची गरज प्रतिपादित करते त्यामध्ये नागरी समाज यांच्यातील संबंधांचा विचार होतो त्यामध्ये आपण सुशासनाच्या विविध मूल्यांचा आधार घेतो.

प्रशासकीय सुधारणा व सुशासनाचे खालील मूल्ये असतात त्यामध्ये सहभाग व प्रतिसाद, कार्यक्षमता, पारदर्शकता, उत्तरदायित्व या मूल्यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

**1) सहभाग-**

सहभाग हा प्रशासकीय सुधारणा आणि सुशासन महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक आहे .कोणत्याही लोकशाही व्यवस्थेच्या परिणामकारक कार्यासाठी लोकसहभाग आवश्यक असतो. जनतेचा आवाज (विचार )आणि मागण्या शासनापर्यंत पोहोचवल्या जातात शासनाची निर्णय प्रक्रिया आणि अमलबजावणी यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळत असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेचा सहभाग हा महत्वाचा असतोच, पण प्रशासकीय व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी जनतेच्या प्रशासकीय सहभागाची आवश्यकता असते. आजच्या प्रातिनिधिक लोकशाहीत जबाबदार शासन आणि प्रशासन अस्तिवात येण्यासाठी जनतेचा शासन आणि प्रशासनामध्ये जास्तीतजास्त सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रातिनिधिक लोकशाही आणि जबाबदार लोकशाही प्रत्यक्षात आणावयाची असेल तर सहभागप्रधान लोकशाही अस्तित्वात आणणे गरजेचे आहे.

विकास योजना यशस्वीरीत्या राबविण्यासाठी जनतेचे सहकार्य आणि सहभाग गरजेचा असतो. स्थानिक लोकांच्या गरजा, परिस्थिती जाणून घेतल्याशिवाय कोणताही उपक्रम यशस्वी होऊ शकत नाही. लोकशाहीमध्ये प्रशासन आणि जनता हे दोघेही सारखेच सहभागी असतात. एखाद्या जोडीदाराप्रमाणे त्यांचे संबंध असावे लागतात. नागरिकांनी प्रशासनाकडे

उदासीन वृत्तीने, संशयी वृत्तीने न पाहता आपला सक्रीय सहभाग नोंदवावा आणि प्रशासनानेही लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी कटिबद्ध राहिले पाहिजे.

**2) पारदर्शकता** -

पारदर्शकता या मूल्यांमुळे गुप्ततेच्या प्रक्रियेत आव्हान मिळते. त्यामुळे सरकारच्या कामावर लक्ष ठेवणे लोकांना शक्य होते. 2005 पासून भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यात आला त्यामुळे नागरिकांना शासकीय कामकाजाविषयीची माहिती मिळवणे शक्य होते .सरकारी कार्यामध्ये पारदर्शकता वाढवणे म्हणजे सरकारी कार्यामध्ये 'खुलेपणा' होय यामुळे नागरिकांना सरकारी कार्याबद्दल माहिती मिळते आणि सरकारी अधिकारी उत्तरदायी होतात. सरकारी कामातील पारदर्शकता म्हणजेच प्रशासकीय निर्णयांची माहिती ,प्रक्रिया आणि खर्च जनतेला सहज उपलब्ध करून देणे होय .माहितीचा अधिकार (RTI) ई - गव्हर्नर्स आणि सोशल ऑडिट द्वारे भ्रष्टाचार कमी होऊन सरकार व नागरिक यांच्या विश्वास निर्माण होतो. यामुळे लोकशाहीत उत्तरदायित्व वाढते आणि सरकारी कार्यक्षमता सुधारते लोकशाही बळकटीकरण कार्यक्षम आणि परिणामकारक लोकशाहीसाठी पारदर्शकता आवश्यक आहे.

**सरकारी पारदर्शकतेची वैशिष्ट्ये.**

1) माहितीचा अधिकार (RTI)- 2005 च्या कायद्यानुसार नागरिकांना सरकारी माहिती मिळवण्याचा वैधानिक अधिकार आहे.

2). ई -. गव्हर्नर्स-डिजिटल माध्यमाद्वारे सेवा आणि निर्णय प्रक्रिया पारदर्शक बनवते.

3) उत्तरदायित्व आणि जबाबदारी -. अधिकार आणि संस्था त्यांच्या कामासाठी जनतेला जबाबदार असतात.

4). लोकसहभाग- निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे.

5) भ्रष्टाचार नियंत्रण- माहिती उघडी असल्याने गैरव्यवहार कमी होतात.

**3) उत्तरदायित्व-**

प्रशासकीय सुधारणा आणि सुशासन यात उत्तरदायित्व या संकल्पनेला खूप महत्त्व आहे. केवळ शासकीय संस्थाच नव्हे तर खाजगी क्षेत्रातील कंपन्या आणि नागरी समाजातील स्वयंसेवी संस्था या जनता आणि आपल्याला भागधारकांप्रती उत्तरदायी असायला हव्यात. सरकारी अधिकारी त्यांना नेमून दिलेल्या कार्यांसाठी आणि सार्वजनिक कर्तव्यात

हलगर्जीपणा केल्यास कायद्याने वैयक्तिकरित्या किंवा राज्य सरकार मार्फत उत्तरदायी असतात. भारतीय संविधानाच्या कलम 300 (1 )सार्वजनिक सेवकांचे वर्तन कायदेशीर चौकटीत असणे आवश्यक आहे. चुकीच्या कृतीसाठी प्रशासकीय न्यायालयीन आणि माहितीचा अधिकार ( RTI )यासारख्या साधनांद्वारे ते जबाबदार धरले जातात.

सरकारी अधिकाऱ्यांच्या उत्तरदायित्वांचे प्रमुख पैलू खालील प्रमाणे

अधिकारी त्यांच्या कर्तव्यात निष्काळजीपणा, कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यास जबाबदार धरले जातात आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. कायद्याचे उल्लंघन किंवा पदाचा गैरवापर केल्यास अधिकारी वैयक्तिकरित्या जबाबदार असतात. कायद्याच्या कक्षेत न येणारी कामे केल्यास किंवा गैरवर्तन केल्यास भारतीय न्यायव्यवस्थेनुसार अधिकारी जबाबदार धरले जाऊ शकतात, कायदेशीर कारवाई होऊ शकते. सरकारी कामकाज पारदर्शक ठेवण्यासाठी आणि अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यासाठी संसद न्यायालयीन पुनरावलोकन आणि RTI कायदा 2005 सारखे उपाय वापरले जातात सरकारी अधिकारी त्यामुळे उत्तरदायी होतात.

**4) जबाबदार प्रशासन -**

जबाबदार प्रशासन यात अधिकारी आपल्या वर्तणुकीबद्दल अधिक जागृत राहतात. जबाबदार प्रशासन म्हणजे पारदर्शक उत्तरदायी आणि लोकभिमुख कामकाज होय . जिथे अधिकारी आपल्या निर्णयांना आणि कृतींना जनतेप्रती जबाबदार असतात. भ्रष्टाचाराला आळा घालून कार्यक्षम सेवा प्रदान करते. लोकशाहीत जनतेच्या करातून मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर सुनिश्चित करते. प्रशासनातील प्रत्येक स्तरावर अधिकारी त्यांच्या कर्तव्यासाठी जबाबदार असतात. नियमावलीनुसार कार्य करतात. आणि भ्रष्टाचाराला आळा घालतात. सरकारी धोरणे निर्णय आणि अंमलबजावणी प्रक्रियेत पारदर्शकता असते ज्यामुळे नागरिक माहिती मिळवू शकतात. प्रशासनाचा दृष्टिकोन लोकांच्या समस्या व अडचणी सोडवण्यावर आणि त्यांना वेळेवर सेवा मिळवून देण्यावर असतो. दिलेल्या प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग आणि फीडबॅक घेतला जातो ज्यामुळे प्रशासन अधिक सर्वसमावेशकता बनते. केवळ निधी खर्च करणे नव्हे तर कामाच्या दर्जावर आणि दीर्घकालीन परिणामांवर भर दिला जातो. जबाबदार प्रशासनाची भूमिका व महत्त्व कायद्याचे पालन करणे. प्रशासन विहित चौकटीत राहून कायद्याचे राज्य राखणे. लोकहित- लोकांच्या दैनंदिन गरजा आणि सुविधा आरोग्य,शिक्षण पूर्ण करणे. नियमन- सरकारी धोरणांचे प्रभावी अंमलबजावणी करते. राजकीय बदल होऊ नाही प्रशासकीय कामात सातत्य राखणे. जबाबदार यंत्रणा असल्याने भ्रष्टाचाराला वाव कमी मिळतो आणि सेवा वितरणात पारदर्शकता येते. नागरिकांचा सरकार वरील विश्वास वाढतो. जबाबदार प्रशासन हे कार्यक्षमतेने आणि नैतिकतेने चालवलेले शासन आहे जे नागरिकांच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देते व पारदर्शकता ही चांगल्या प्रशासनाची गुरुकिल्ली असून ती लोकशाहीला अधिक मजबूत करते.

**5) कार्यक्षमता-**

प्रशासनिक कार्यक्षमता वाढविणे. प्रशासनिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा, ई -ऑफिस अवलंब, कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण, स्पष्ट नियम व प्रक्रिया आणि जलद तक्रार निवारण यंत्रणा आवश्यक आहे यामुळे कामात पारदर्शकता उत्तरदायित्व आणि उत्पादकता वाढून प्रशासन अधिक लोककेंद्रीत बनते.

प्रशासनिक कार्यक्षमता वाढविण्याचे प्रमुख उपाय डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर होय. डिजिटलायझेशन ई-ऑफिस आणि गव्हर्मेंट ई मार्केट द्वारे खरेदी प्रक्रिया सुलभ करणे ज्यामुळे पारदर्शकता वाढते आणि वेळ वाचतो. कर्मचारी प्रशिक्षण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण घेणे. तसेच प्रशिक्षणाची गरज ओळखणे होय. कामाचे योग्य नियोजनांवर भर देऊन प्रक्रियेत सुधारणा, निर्णय प्रक्रियेत स्पष्टता असावी आणि कामांची रेंगाळलेली पद्धत टाळणे.

**निष्कर्ष -**

प्रशासकीय सुधारणा आणि सुशासन यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. डिजिटल इंडिया आणि ई - गव्हर्नन्स यांचा योग्य वापर करून प्रशासन अधिक प्रभावी केले जाऊ शकते.

**संदर्भ**


- 1). भारतातील शैक्षणिक प्रशासन डॉ.सतीश ठोंबरे, प्रा. प्रकाश शिंदे 2015
- 2) भारतीय प्रशासन प्रा. डॉ. सतीश ठोंबरे 2017
- 3) भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया प्रा .के आर .बंग 2011
- 4) भारत सरकार 2023 डिजिटल इंडिया
- 5) शर्मा .आर .2022 इ गव्हर्नर्स इन इंडिया
- 6) पाटील. एस 2021 डिजिटल ॲडमिनिस्ट्रेशन


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*